# भारतातील स्त्री-मुक्ती चळवळ – एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप

उषा वातार

(भारतातील स्त्री मुक्ती चळवळ संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेल्या स्त्री दशकापासून, म्हणजे १९७५ पासून सुरू झाली असे विधान अनेकवेळा केले जाते. वास्तविक आपल्या चळवळीचा इतिहास किती जुना आहे याची माहिती देणारा हा लेख येथे छापत आहोत.)

एकोणिसाव्या शतकात भारतात सुधारणेच्या काळातच स्त्री–मुक्ती चळवळीची सुरुवात झाली. सरंजामशाही अर्थव्यवस्था मध्ययुगापासून अस्तित्वात होती. अशा व्यवस्थेत स्त्री ही पुरुषाची खाजगी संपत्ती, जंगम मिळकत, दासी, गुलाम समजली जात असे. अनिष्ट धार्मिक परंपरा, रूढी, अंधश्रद्धा, धर्मवेडेपणा यांच्या त्या बळी असत. (अर्थात आजही ही परिस्थिती फारशी बदललेली नाही.) सतीची चाल, बालविवाह, कन्या हत्या, कन्या विक्री, देवदासी प्रथा, वेश्या व्यवसाय अशा व्यवस्थेचा समाजात कळस झाला होता. सती प्रथेचा बंगाली, राजपूत, जाट, शीख वगैरे समाजात गौरव केला जात असे. मुस्लिम महिलांची परिस्थितीही गंभीर आणि मागासलेली होती. (आजही ती तशीच आहे). हिंदु आणि मुस्लिम समाजात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. उच्च वर्गातील स्त्रियांची आर्थिक परिस्थिती जरी चांगली होती तरी व्यक्तीविकासाच्या, व्यक्तीस्वातंत्र्याच्या, शिक्षणाच्या वाटा त्यांना मोकळ्या नव्हत्या.

स्वातंत्र्यपूर्व काळातील परकीय अतिक्रमणे, सरंजामशाही, वर्ण व जातीची उतरंड अशा परिस्थितीत तळाशी असलेला पुरुष वर्गही शोषणग्रस्त होता हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शिक्षण, शास्त्रावर आधारित ज्ञान, उच्च संस्कृती यापासून ते वंचित होते. अंधश्रद्धा, धर्मवेडेपणा यांचे तेही बळी होते. असे असले तरी 'पुरुष' म्हणून पुरुषप्रधान व्यवस्थेत ते स्त्रियांच्यापेक्षा उच्च स्थानावर होते म्हणूनच ते स्त्रियांवर सत्ता गाजवीत असत. अत्याचार आणि छळही करीत असत. स्त्रियांशी वागण्याची पद्धत कित्येकदा अंतर्विरोधीही असे. अंधश्रद्धेपोटी, धर्मवेडेपणामुळे स्त्रियांना देवता समजून गौरविले जाई तर दासी आणि गुलाम समजून तिचा छळही होई.

## वसाहतवादाचा परिणाम

वरील सामाजिक परिस्थिती अस्तित्वात असली तरी तिच्या तो सुधारणा घडवून आणण्याचे तुरळक प्रयत्नही होत होते. पण आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची त्यात शक्ती नव्हती, या परिस्थितीचा फायदा वसाहतवादी ब्रिटिश सरकारने उठवला. जमीनदारांना हाताशी धरून त्यांच्या फायद्याचे जमीनविषयक कायदे करून त्यांच्याकरवी छोटे शेतकरी, शेतमजूर यांचे शोषण ते करू लागले. वर्णभेद, जातीभेद यामुळे भारतीय समाज एकसंघ नव्हता. त्यात ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणामुळे शोषण मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे भारतीय समाजाची चौकट खिळखिळी होऊ लागली, या सर्वांचा परिणाम स्त्रियांच्या स्थितीवर, दर्जावर विपरीत झाला कौटुंबिक–सामाजिक उतरंडीत तळाशी असलेल्या स्त्रियांचे स्थान, दर्जा आणखीनच खालावला. त्यांच्या भोवती अनिष्ट रूढी, परंपरा यांचा विळखा जास्तच घट्ट होत गेला.

## भारतातील सुधारणेचा काळ

सत्तेची पकड जास्तीत जास्त घट्ट करण्यासाठी आणि राज्यकारभाराच्या सोयीसाठी ब्रिटिश सरकारने दळणवळणाची प्रगत साधने, छपाई यंत्रे, शिक्षण पद्धती इकडे आणली. याचा परिणाम होऊन शिक्षित असा मध्यम वर्ग निर्माण झाला. समाजातील अनिष्ट रूढी, धर्मवेडेपणा, अंधश्रद्धा यांच्या विरोधात समाज प्रबोधन करण्याचे कार्य शिक्षित वर्गाने केले. समाज प्रबोधनाच्या

कार्यात सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे मागासलेपण, त्यांची मानहानी, रूढी, परंपरा यामुळे त्यांना मिळणारी अन्यायाची वागणूक, स्त्री–पुरुष असमानता ह्या विषयांना प्राधान्य होते. त्या काळातल्या राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, अक्षयकुमारदत्त, देवेंद्रनाथ टागोर, दयानंद सरस्वती इत्यादी बंगाल-मधील विचारवंत, गुजराथमधील निर्मल दुर्गाराम, मद्रासचे वीरसलिंगम पामतुलु व वेंकटरत्नम नायडू, तसेच महाराष्ट्रात महादेव गोविंद रानडे, गोपाळकृष्ण गोखले, बेहरामजी मलबरी, धोंडो केशव कर्वे, महात्मा फुले, लोकहितवादी इत्यादींनी समाजसुधारणेचे महत्त्वाचे कार्य केले. या सर्वांच्या कार्यांच्या केन्द्रस्थानी स्त्रियांचा प्रश्न होता. या सर्वांनी कधी एकत्रितपणे येऊन तर कधी एकेकटयाने कार्य केले. पण इथे एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे की या काळात स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी एकसंघ अशी चळवळ मात्र निर्माण झाली नाही. सुधारणेचे फायदे उच्च वर्गातील स्त्रियांना मिळाले. तळागाळातल्या सर्वसामान्य स्त्रिया या सुधारणापासून मात्र वंचित राहिल्या. अशी परिस्थिती असली तरीसुद्धा समाजसुधारकांच्या प्रबोधनाने, कार्याने काही सुधारणा घडून आल्या. स्त्री शिक्षणाचे प्रयत्न ठिकठिकाणी होऊ लागले. स्त्रियांसाठी काही कल्याणकारी कार्यक्रम, उपक्रम होऊ लागले. पुरुष समाजसुधारकांनी सुरू केलेल्या कार्यामुळे काही स्त्रिया प्रभावित झाल्या. त्यांनीही ह्या कार्यात उल्लेखनीय अशी कामगिरी केली. बंगालमध्ये स्वर्णकुमारी देवी आणि सरलादेवी चौधरी, महाराष्ट्रात पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे; आनंदीबाई जोशी, फ्रान्सेका सोहराबजी, दक्षिणेत ॲनी जगन्नाथ, रुखमाबाई इत्यादींनी स्त्रियांची परिस्थिती सुधारण्याचे अनेक मार्गांनी प्रयत्न केले.

## स्त्रियांच्या लढ्याला काँग्रेसचा पाठिंबा

एकीकडे समाजसुधारणेचे प्रयत्न चालू होते तर दुसरीकडे स्वातंत्र्य लढ्याची उभारणी होत होती. स्त्रियांची परिस्थिती सुधारण्याचे कार्य स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर रहाणे शक्य नव्हते. स्त्रियांच्या प्रश्नावर जनजागरण करून त्यांच्यासंबंधी असलेल्या कायद्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या मागण्या ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडे करण्यात आल्या. स्वातंत्र्य चळवळीत असलेल्या पुढाऱ्यांनी स्त्रियांना मतदानाचा हक्क आणि इतर काही कायदेशीर हक्क देण्याचा रेटा लावून सरकारकडे त्यासंबंधी मागणी केली.

१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. भारतातील विचारवंत, समाजसुधारक, मध्यम वर्गीय इत्यादी काँग्रेसचे संस्थापक होते. स्त्रियांच्या परिस्थितीत प्रगती घडवून आणून त्यांना पुरुषांसारखा समान दर्जा मिळाल्याशिवाय त्यांच्या मतदानाच्या हक्काला काहीच राजकीय अर्थ प्राप्त होणार नाही अशी काँग्रेसची स्त्रियांच्या बाबतीत भूमिका सुरुवातीपासून होती. म. गांधींनी पुढे याच भूमिकेचा अंगिकार केला आणि अनेक स्त्रियांना स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. याचा परिणाम होऊन ठिकठिकाणी स्त्रियांनी स्वातंत्र्य लढ्यात मोठ्या संख्येने भाग घेतला. काँग्रेसने स्त्रियांच्या सामाजिक आणि कायदेशीर हक्काबाबतच्या चळवळीला पाठिंबा दिला. विशेषत: मतदानाच्या हक्काच्या बाबतीत दिलेला पाठिंबा उल्लेखनीय आहे.

कदम्बिनी गांगुली, स्वर्णकुमारी घोषल, पंडिता रमाबाई, विद्यागौरी निलकंठ, श्रीमती निक्वासा या पाच महिला प्रतिनिधी काँग्रेसच्या १८८९ च्या पाचव्या अधिवेशनात उपस्थित तर होत्याच, त्याशिवाय ॲनी बेझंट व सरोजिनी नायडू यांनी अनुक्रमे १९१७ आणि १९२५ साली अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले. मादाम कामा, भगिनी निवेदिता, सरलादेवी, मादाम बिकाजी रुस्तुम, के. आर. कामा यांनी क्रांतिकारी स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची कामे केली. मादाम कामा यांनी जर्मनीमध्ये स्टुटगार्टला झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी सभेत भाग घेतला, इतकेच नाही तर आपल्या भाषणाच्या अखेरी तिरंगा झेंडा फडकविणारी ती पहिली भारतीय व्यक्ती होती.

१९०९ ते १९११ च्या दरम्यान भारतात क्रांतिकारी लढ्याची एक मोठी लाटच उसळली होती. य क्रांतिकारी लढ्यातही अनेक स्त्रियांनी प्रत्यक्ष अथव अप्रत्यक्ष भाग घेतला होता, अगदी गृहिणींपासून कष्टकरी स्त्रियापर्यंत स्त्रिया यात सामील होत्या. गुप्तप

क्रांतिकारकांना मदत करीत इतकेच नाही तर काहींनी लाठ्या काठ्या, तलवारी, बंदुका चालविण्याचे शिक्षण पुरुषांच्या बरोबरीने घेतले.

१९१८ नंतर दुसरे महायुद्ध संपले. युद्धामुळे भारतातील आर्थिक परिस्थिती मोडकळीला आली. शेतमजूर, कामगार, कष्टकरी वर्ग आणि मध्यम वर्ग यांच्या जीवनावर आघात होऊ लागले. त्यातूनच कामगार वर्गाने त्यांच्या मागण्यांसाठी संघटित होण्यास सुरुवात केली. महिला कामगार, शेतमजूर स्त्रिया आणि मध्यम वर्गीय स्त्रिया सर्व सामान्य लोकांच्या संघटित चळवळीमध्ये भाग घेऊ लागल्या.

## अ. भा. महिला परिषदेची स्थापना

स्त्रियांच्या मतदानाच्या हक्काविषयी मागणी करणाऱ्या, सरोजिनी नायडू आणि ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या चळवळीने महिलांसाठी शिक्षण, आरोग्य-सुविधा, बाळंतपणाच्या काळातील आरोग्याची देखभाल अशा इतर मागण्यांचे पत्रक ब्रिटिश सरकारला सादर केले. राष्ट्रीय काँग्रेसने या मागण्यांना पाठिंबा दिला. पण पुढे मात्र चळवळीच्या रेट्यामुळे १९२९ मध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा मतदानाचा हक्क मिळाला. मार्गरेट कझिन्स आणि ॲनी बेझंटने भारतीय महिला समिती स्थापन करण्यात पुढाकार घेतला. ही समिती स्त्रियांचे हक्क आणि मागण्या यावर चर्चा आयोजित करून त्याविषयी जागृतीचे कार्य करीत असे. या समितीलाच पुढे फार मोठे स्वरूप देऊन तिला 'अखिल भारतीय महिला परिषद' असे नाव दिले. प्रथम श्रीनगर, मद्रास, कालिकत, तंजावर, विजयवाडा आणि मुंबई अशा ठिकाणी व कालांतराने इतरत्रही अनेक ठिकाणी त्यांच्या शाखा निर्माण झाल्या. आजही ही परिषद अस्तित्वात आहे.

## स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांचा सहभाग

१९२९ नंतर गांधीजींनी पुकारलेल्या ब्रिटिश सरकार विरुद्धच्या असहकाराच्या लढ्यात स्त्रियांनी फार मोठ्या संख्येने भाग घेतला. परदेशी वस्तू वापरण्याचे सोडून देऊन अशा वस्तूंच्या होळ्या पेटवल्या, देशबंधू चित्तरंजन दास, लाला लजपत राय, मोतीलाल नेहरू, महात्मा गांधी अशा मान्यवर राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या घरातील बायका पण या लढ्यात सहभागी झाल्या. सर्वसामान्य घरातील स्त्रियाही देशाच्या सर्वच भागातून स्वयंसेविका बनून लढ्यात सामील होऊ लागल्या. स्वातंत्र्य लढ्यात हिंदु-मुस्लिम एकत्रित येऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध झगडत होते. हिंदु पुढाऱ्यांच्या घरातील स्त्रियाही या लढ्यात होत्या हे पूर्वीच नमूद केले आहे. मुस्लिम पुढाऱ्यांच्या घरातील स्त्रियाही घराबाहेर पडून स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेत होत्या. खिलाफत चळवळीचे पुढारी महंमद अली आणि शौकत अली यांची आई 'बाई अम्मन' ही अत्यंत क्रियाशील होती. मुस्लिम महिला समिती आणि खिलाफत दोन्ही ठिकाणी तिने महत्त्वाची कामगिरी केली. या समितीने प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारत भेटीला विरोध करण्यासाठी महिलांच्या सभा घेतल्या. खादीच्या कापडाचा वापर लोकांनी करावा असे आवाहन त्यांनी केले. देशातील जवळ जवळ सर्व भागातून स्वातंत्र्य चळवळीत मुस्लीम महिलांनी भाग घेतला ही वस्तुस्थिती आहे.

राजकीय चळवळीत देशातल्या ठिकठिकाणच्या सर्वच स्तरातील महिला सक्रीय भाग घेत होत्या. त्याबरोबरच शैक्षणिक, सामाजिक आणि कायद्याच्या हक्कांच्या क्षेत्रातील चळवळीत काही उच्च स्तरातील महिलांनी पुढारीपण केले आणि महिलांची परिस्थिती सुधारण्याच्या कामात प्रयत्न केले. अखिल भारतीय महिला परिषदेचे पहिले अधिवेशन पुण्यात १९२७ मध्ये भरले. त्याचे अध्यक्षस्थान बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई गायकवाड यांनी भूषविले. मार्गारेट कझिन्स परिषदेच्या सचिव होत्या. सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, रेणुका रॉय, राजकुमारी अमृत कौर, रामेश्वरी नेहरू, बेगम हमीद अली, डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी इत्यादी उच्चभ्रू महिलांचे नेतृत्व परिषदेत होते. या पहिल्या अधिवेशनात स्त्री शिक्षण, प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रश्न, प्रौढ शिक्षण यावर ठराव केले. बाल विवाह प्रथेवर कडक टीका करून त्याचा धिःकार केला. महिला आणि मुले यांच्या संदर्भातील सामाजिक प्रश्नांवर समाज कार्याच्या दिशा आखणे, त्यांच्याविषयीचे कल्याणकारी कार्यक्रम राबवणे आणि त्यांची उन्नती साधणे हे अखिल भारतीय महिला परिषदेचे स्थापनेच्या वेळीच ठरवलेले ध्येय

धोरण होते. राजकीय चळवळीचा उद्देश त्यामागे नव्हता. त्यांच्या मोहिमा बाल विवाह पद्धती थांबवणे, अनेक पत्नीत्वाला विरोध करणे, पडदा पद्धती नष्ट करणे, हुंड्याला विरोध करणे, विधवा विवाहाचा पुरस्कार करणे, संपत्तीमध्ये अधिकार मागणे इत्यादी विषयांवर आखल्या जात असत.

राजकीय चळवळीपासून अलिप्त राहून फक्त सामाजिक प्रश्न हाती घेण्याचे ध्येय धोरण परिषदेने जरी निश्चित केले होते तरी त्यासाठी ज्या मागण्या आणि कायद्यात सुधारणा करावयाच्या होत्या त्या ब्रिटिश सरकारकडे. त्यामुळे परिषदेला राजकारणापासून अलग रहाता येणे शक्यच नव्हते हे त्यांना लवकरच लक्षात आले. १९२९ मध्ये लंडनमध्ये भारताच्याविषयी जी गोलमेज परिषद ब्रिटिश सरकारने आयोजित केली त्यात अखिल भारतीय महिला परिषदेने आपल्या दोन प्रतिनिधींना स्थान मिळावे यासाठी मागणी केली. पहिल्या गोलमेज परिषदेबाबत ही मागणी ब्रिटिश सरकारने फेटाळली. दुसऱ्या गोलमेज परिषदेत सरोजिनी नायडू यांना प्रतिनिधित्व मिळाले, पण सरकारने त्यांना " महिलांचे प्रतिनिधित्व " करू दिले नाही. तरीसुद्धा महिलांच्या वतीने त्यांनी एक निवेदन ब्रिटिश सरकारला दिले. त्या निवेदनात त्यांनी प्रौढांना मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे, महिला व पुरुष यांचा एकत्र मतदार संघ असावा आणि स्त्रियांसाठी राखीव जागा नसाव्यात अशा मागण्या केल्या. काही दिवसांनी अ. भा. म. परिषदेच्या तीन प्रतिनिधींना त्यांची मते मांडण्यासाठी ब्रिटिश सरकारने बोलावले. त्यानुसार बेगम हमीद अली, राजकुमारी अमृत कौर आणि डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी लंडनला त्यांचे विचार मांडण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी ब्रिटिश महिला संघटना व आंतरराष्ट्रीय महिला संघाशी संपर्क साधला. काही कालानंतर अ. भा. म. परिषदेला अनौपचारिक पद्धतीने संयुक्त राष्ट्रसंघाने स्थान दिले. त्यांच्या मदतीने ती कार्य करू लागली.

आपले विचार ब्रिटिश सरकारपुढे मांडण्याचे आमंत्रण मिळालेल्या या तीन महिला, ब्रिटिश सरकारची मागण्यांबाबतची अनास्था, त्यांचा हेकेखोरपणा आणि जातीवर आधारलेले मानमरातबांचे किताब देऊन भारतीय जनतेत फूट पाडण्याचा कुटील डाव पाहून अत्यंत उद्विग्न झाल्या. आपल्या मागण्या मान्य होतील ही मनात बाळगलेली त्यांची स्वप्नेही पार धुळीला मिळाली. या अपयशाने, अ. भा. म. परिषदेच्या नेतृत्वस्थानी असलेल्या महिलांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घ्यायला सुरुवात केली. १९३० मध्ये गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहात मोठ्या प्रमाणात महिला सामील झाल्या. म. गांधींच्या अटकेनंतर सरोजिनी नायडूंनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

याच सुमारास देशात ठिकठिकाणी महिलांनी संघ, संघटना स्थापन केल्या. बंगालमध्ये तर अनेक महिला संघटनांचे एक जाळेच तयार झाले. त्यातील ज्या स्वातंत्र्य लढ्यात खूपच सक्रीय होत्या, त्यांच्यावर ब्रिटिश सरकारने बंदी घातली. हे महिलांचे संघ जागोजागी सभा घेत, मिरवणुका काढत, सरकारशी असहकार करण्यासाठी प्रचार करत, परदेशी वस्तूवर बहिष्कार घालण्याचे आवाहन करत, घरी सूत कातून खादीचे कापड तयार करण्यास सांगत.

उदाहरणार्थ कोमिला येथे भरलेल्या अधिवेशनात महिलांनी पुढील ठराव संमत केले.

१) महिला समित्या स्थापन करण्याची आवश्यकता, २) परदेशी वस्तूंवर बहिष्कार. ३) हिंदु–मुस्लिम ऐक्य घडून येण्याचे प्रयत्न करणे. ४) पडदा पद्धती आणि अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे. त्यासाठी प्रयत्न करणे. ५) जेलमध्ये असलेल्यांवर उघडपणे खटले चालावेत. ६) कॉंग्रेसने सुरू केलेल्या लढ्याला पाठिंबा देणे.

वरील ठरावावरून एक महत्त्वाची बाब लक्षात येते, की या स्त्रियांनी फक्त सामाजिक प्रश्नाभोवती आपली चळवळ उभारली नाही तर राजकीय प्रश्नांमध्ये सुद्धा त्यांची बांधिलकी होती. १९३०–३१ मध्ये जवळजवळ २० हजार स्त्रियांनी सविनय कायदेभंगाच्या कारणामुळे तुरुंगवास भोगला. प्रत्येक सहा पुरुषांच्या मागे एक स्त्री राजकीय चळवळीत सक्रीय होती आणि तिच्यावर खटला भरला गेला होता. ब्रिटिश सरकारच्या पोलीस खात्याने त्यांना अत्यंत क्रूर अपमानास्पद वागणूक दिली. एवढेच नव्हे तर अश्लिलपणानेही ते या महिलांशी वर्तणूक करीत. कॉंग्रेसने या विरूद्ध पत्रक काढले. असहकाराची चळवळ जेव्हा गांधीजींनी थांबविली

त्यावेळेस ते उद्‌गारले– ' स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांची कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावी अशी आहे '

बंगालमध्ये क्रांतीकारी चळवळीचा खूप जोर होता. या चळवळीमध्ये बंगालमधील महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने भाग घेऊन हौतात्म्य स्वीकारले. काही जणींनी प्रदीर्घ तुरुंगवास भोगला. प्रितिलता नावाच्या महिलेचा उल्लेख करणे फार महत्त्वाचे आहे. ब्रिटिशांकडून अटक होऊ नये म्हणून तिने विषाची गोळी जवळ बाळगली होती. तिने विष खाऊन मृत्यूला कवटाळले, पण ब्रिटिशांकडून अटक करून घेतली नाही.

## विद्यार्थिनींचा सहभाग

आतापर्यंत आपण असे पाहिले की भारतातील महिलांनी राजकीय आणि सामाजिक चळवळीत हिरीरीने, धैर्याने पुरुषांच्या बरोबरीने भाग घेतला. १९३० च्या नंतर आणखीन एक चळवळ उदयाला आली. ती म्हणजे विद्यार्थी चळवळ. या चळवळीतही विद्यार्थिनींचा सहभाग लक्षणीय होता. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली असलेल्या चळवळीने ब्रिटिशांशी पुढे थोडे नरमाईचे, तडजोडी करण्याचे धोरण स्वीकारले होते. याच सुमारास डाव्या विचारसरणीचा प्रसारही होत होता. काँग्रेसमधील ज्या काही व्यक्तींना नरमाईचे आणि तडजोडीचे धोरण मान्य नव्हते, ते डाव्या विचारसरणीकडे आकर्षित झाले. अशा व्यक्तींपैकी काँग्रेसचे अध्यक्ष असलेले नेताजी सुभाषचंद्र बोस एक होते. काँग्रेसमध्ये चळवळीत असलेल्या विद्यार्थ्यांना सुद्धा काँग्रेसचे तडजोडी करण्याचे धोरण पटले नाही. त्यांनीही डाव्या विचारसरणीचा अंगीकार केला. या विचारसरणीने प्रेरीत झालेल्या विद्यार्थ्यांनी ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशन या नावाने चळवळ सुरू केली. या चळवळीत बंगालच्या विद्यार्थ्यांनी फार महत्त्वाची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांच्या या चळवळीत मुलींचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. मुलींमध्ये बंगालची कनक दास गुप्ता (मुखर्जी), पंजाबची पेरिन भरूचा (रमेशचंद्र), मुंबईची नर्गिस बाटलीवाला यांनी नेतृत्व दिले. त्यांनी १९४० मध्ये विद्यार्थिनींची परिषद लखनौ येथे घेतली. या परिषदेला ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशनचा पाठिंबा होता. सरोजिनी नायडू या प्रमुख पाहुण्या होत्या तर रेणू रॉय अध्यक्ष होत्या. या अधिवेशनात विद्यार्थिनींच्या मागण्यांचे ठराव तर केले गेलेच, पण प्रौढ महिलांसाठीही काही मागण्या केल्या गेल्या. त्यात स्त्री आणि पुरुष यांना समान कायदे, लग्न आणि घटस्फोटाचे समान कायदे, आर्थिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रात स्त्री पुरुषाचे समान स्थान यावर प्रामुख्याने भर दिला होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर सामाजिक परिस्थिती थोडी सुधारली, कॉलेजमध्ये मुले व मुली मोकळेपणाने एकमेकांमध्ये मिसळू लागली. तरीसुद्धा काही सामाजिक बंधने आड येत होती. त्यांच्याशी या तरुणींना मुकाबला करावा लागला. याच चळवळीतील बऱ्याच विद्यार्थिनी पुढील काळात स्त्रियांच्या लोकशाही चळवळीत सहभागी झाल्या.

## कष्टकरी स्त्रियांचे प्रश्न

वरील चळवळीच्या बरोबरच शेतकरी मजूर चळवळीलाही वेग येत होता. त्यात महिला शेतकरी व मजूर यांची संख्या लक्षणीय होती. महाराष्ट्रात सुंदराबाई, बंगालमध्ये संतोष कुमारी देवी, प्रभावती दास गुप्ता, डॉ. मैत्रियी बोस, बेगम सकीना फारूक सुलताना, सुधा रे, लबन्या प्रोबा देवी यांनी या चळवळीचे नेतृत्व केले. विशेषत: चहाचे मळे, कापड उद्योग, ज्यूट उद्योग आणि करमुक्ततेची चळवळ या क्षेत्रात चळवळीत महिला नेतृत्वाने उल्लेखनीय काम केले.

कष्टकरी वर्गांचा जो कम्युनिस्ट पक्ष भारतात स्थापन झाला. त्या पक्षाने १९३० मध्येच स्त्रियांच्या मुक्तीविषयी आराखडा प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी घोषित केले–'कष्टकरी स्त्रिया सरंजाम शाहीतील आर्थिक गुलामगिरी आणि कायदा, संस्कृती आणि आर्थिक क्षेत्र यामध्ये असलेली स्त्री–पुरुष असमानता या दोन्ही जोखडांच्या खाली भरडली जात आहे. तिच्यावर दुहेरी ओझे आहे, स्वत:च्या भवितव्याविषयी काहीही निश्चित करण्याचे त्यांना अधिकार नाहीत. बऱ्याचशा प्रांतात त्यांच्यावर पडदा पद्धती लादली जाते. सामाजिक कार्यात भाग घेण्याचे त्यांना अधिकार नाहीत. समाजात मोकळेपणाने हिंडण्या फिरण्याची त्यांना बंदी आहे. काम करण्याच्या ठिकाणी त्यांचे शोषण होते. त्यांच्या या गुलामगिरीस दुःख जीवनाची कारणे सरंजामशाही-

मध्ये आहे. अशा या सरंजामशाहीचे ब्रिटिश साम्राज्यवादी हेतुपुरस्सर अस्तित्व टिकवत आहेत

कम्युनिस्ट पक्ष स्त्रियांना सामाजिक, आर्थिक आणि न्यायाच्या बाबतीत समता मिळावी म्हणून लढत आहे. भूगर्भामध्ये खाणीत करावे लागणारे काम स्त्रियांना देऊ नये यासाठी पण कम्युनिस्ट पक्ष लढा देत आहे. पगारी बाळंतपणाची रजा, मोफत आरोग्य सेवा, सर्व कारखान्यांमध्ये पाळणाघराची सुविधा, त्याचप्रमाणे अंगावर दूध पाजणाऱ्या मातांसाठी कामाचे फक्त सहा तास या मागण्यांसाठी पक्ष संघर्ष करीत आहे.

१९३४ नंतर कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली परंतु आपल्याला असे दिसते की कामगार, कष्टकरी स्त्रिया आणि मध्यम वर्गीय स्त्रियांना देशातील व्यापक अशा चळवळीत सहभागी होण्याची गरज भासली. समाजातील सर्वच स्त्रियांची काही समान दुखणी-खुपणी होती. कोणत्याही वर्गातील, जातीतील, धर्मातील सर्वच स्त्रियांना असमानतेची अन्यायाची आणि दुय्यम वागणूक मिळत होती. म्हणून त्या एकत्र येऊन संघटना बांधण्याचे प्रयत्न करून साम्राज्यशाही आणि सरंजामशाही त्या दोन्ही विरूद्ध आवाज उठवत होत्या.

अ. भा. महिला परिषदेने स्त्रियांच्या सामाजिक आणि कायदेशीर हक्कांविषयी न्याय मिळवून देण्याचे थोडे फार काम केले, परंतु तळागाळातील जनसामान्यांपर्यंत परिषद पोचू शकली नाही. या तळागाळातील महिलांमध्ये पुरोगामी स्त्री-मुक्ती चळवळीची बीजे आणि शक्ती होती. कष्टकरी महिलांचा प्रवाह व्यापक कामगार, शेतकरी आणि मध्यमवर्गाच्या व्यापक चळवळीत सामील झाला. त्याचे संघटित स्वरूप दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर अधिक स्पष्ट झाले.

दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर कम्युनिस्ट पक्षाच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या महिलांच्या जनसंघटकांनी फॅसिस्ट आक्रमणाविरुद्ध लढण्यासाठी, देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी आणि दुष्काळ पिडित लोकांचे जीव वाचविण्यासाठी महिलांना संघटित केले. बंगाल, आसाम, त्रिपुरा, आंध्र, मद्रास, मलबार, त्रावणकोर, कोचिन, तामिळनाडू, महाराष्ट्र आणि पंजाब इ. ठिकाणी अशा संघटना स्थापन झाल्या. या सर्व संघटनांमध्ये बंगालची महिला आत्मरक्षा समिती फार प्रसिद्ध होती. तिचे काम फारच उठावदार होते.

या टप्प्यात स्त्री संघटनांनी स्त्री चळवळीचा वारसा पुढे नेऊन सामाजिक आणि कायदेशीर हक्कांसाठी लढा दिला. तसेच स्वातंत्र्य चळवळीतील परंपरा चालू ठेवली. या संघटनांचे वैशिष्टच असे की त्यांनी महिला चळवळीचा संबंध शेतकरी कामगार चळवळीशी संघटितपणे जोडला.

बंगालची तिभागा चळवळ, ऐतिहासिक तेलंगणाचा लढा, आसाममधील सुरमा खोऱ्यातील किसानाची चळवळ, मलबार (केरळ) येथील शेतकरी हुतात्म्यांना पाठिंबा लढा, या सर्व शेतकरी चळवळीमध्ये तेथील महिला संघटना कार्यरत होत्या. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आणि चलेजाव चळवळीनंतर स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या काळात देशात विविध ठिकाणी कामगारांचे अनेक ऐतिहासिक लढे झाले. त्यात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. केरळमधील काथ्या कामगाराचे लढे, १९४६ चा तामिळनाडूमधील रेल्वे कामगाराचा शौर्यपूर्ण संप, महाराष्ट्रातील गिरणी कामगार युनियनचा १९४० चा ऐतिहासिक कामगारांचा संप, नाविकांचे बंड, महिला संघटनांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. शेतकरी कामगारांच्या या लढ्यामध्ये अनेक स्त्रियांनी बलिदान केले, हौतात्म्य स्वीकारले.

जनतेच्या प्रदीर्घ लढ्यानंतर १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. परंतु फाळणीची किंमतही मोजावी लागली. याचबरोबर एक पर्व संपले नव्या युगाच्या स्त्री चळवळीसमोर नवी आव्हाने होती– पण त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर, क्रांतिकारी स्त्रियांचा आदर्श पण होता. हा आदर्श समोर ठेवूनच भारतातील स्त्री मुक्ती चळवळ पुढील वाटचाल करीत आहे.

□